दै. पुण्य नगरी दि. 10.12.2019

# दागिने असलेली पर्स ऑटोचालकाने केली परत

**नांदेड/प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान ऑटोत विसरलेली पर्स ऑटोचालकाने भाग्यनगर पोलिसांकडे सुपूर्द केली. दागिने, रोख रक्कम, एटीएम आदी महत्वाचे साहित्य असलेली पर्स पोलिसांनी मालकाचा शोध घेवून परत केली. ऑटोचालकाने दाखविलेला प्रामाणिकपणा व पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळेच विसरलेली पर्स मुळ मालकापर्यंत काही तासातच पुन्हा पोचली.

आशा विश्वनाथ जाधव या सोमवारी सकाळी रेल्वेस्थानक ते उल्हासनगर मार्गावरुन ऑटोने (क्रमांक एमएच २६ बीडी ३०९४) प्रवास करत होत्या. पर्स ऑटोतच विसरुन त्या उतरल्या. काही वेळाने चालक सत्यपाल संभाजी खिराडे (रा. हिंगोली नाका) यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी पर्सची तपासणी केली असता त्यात मोबाईल, रोख रक्कम, सोन्याचे दागिने, एटीएम आदी साहित्य त्यांना आढळून आले. खिराडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता भाग्यनगर पोलिस ठाणे गाठले. दरम्यान, पर्स विसरल्याचे लक्षात येताच आशा जाधव यांनी पर्समधील मोबाईलवर कॉल केला असता तो पोलिसांनी रिसीव्ह केला. त्यानंतर पोलिसांनी आशा जाधव यांना भाग्यनगर ठाण्यात बोलावून शहानिशा करण्यात आली. खात्री पटल्यावर मुद्देमालासह ही पर्स जाधव यांना सुपूर्द करण्यात आली. भाग्यनगर पोलिसांनी ऑटोचालकाच्या प्रामाणिकपणाची दाखल घेत त्याचा सत्कार केला. या वेळी पोलिस उपनिरीक्षक सुरेश नरवडे, पोहेकॉ. तुकाराम कागणे, पोना. राजू कांबळे, सुमेध पुंडगे, रेश्मा हाके, गुर्लेवाड आदी उपस्थित होते.



पुण्यनगरी 10/12/19